**Percentage of seats earmarked for reserved categories as per GOI/State government rule:**

As per the order issued in Government Resolution Higher and Technical Education and Employment Planning Department No. US6-1493/2428 – VS - 4/dated 23rd June 1994 and same numbered corrigendum dated- July 1994 50% seats be reserved for students belonging to other backward classes for the purpose of admission to non-agriculture University and affiliated government/non-government and Arts, Science and Commerce, Education and other Education Institution.

SC-13%

ST-7%

OBC-32%

Divyangjan-3%

This was implemented on 13th December, 2002 Ministry of Human Resource Department ,Department of Secondary and Higher Education ,New Delhi.

| Sr. No. | Caste Category | Reservation Percentage |
|---|---|---|
| 1. | Scheduled Caste ( SC ) | 13% |
| 2. | Scheduled Tribe ( ST) | 7% |
| 3. | VJ-A | 3% |
| 4. | NT-B | 2.5% |
| 5. | NT-C | 3.5% |
| 6. | NT-D | 2% |
| 7. | SBC | 2% |
| 8. | OBC | 19% |
| 9. | EWS | 10% |

ACTING PRINCIPAL
Samaj Bhushan Baburao alias Appasaheb
Jedhe Arts, Commerce & Science College
Pune-411 002.

Ring

श्री ... पुणे
समाजभूषण ... जेधे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पुणे-२.
आवक क्र. ९६८/२०२०-२१
तारीख ०७/०८/२०२०
फाईल क्र

## बिगर अल्पसंख्याक शाळामधील प्रवेशासाठी आरक्षण :

### १) संविधानिक/सामाजिक आरक्षणांतर्गत राखीव जागा

| क्र. | प्रवर्ग | रायगड वगळून इतर सर्व क्षेत्र |
|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती (SC) | १३% |
| २. | अनुसूचित जमाती (ST) | ०७% |
| ३. | विमुक्त जाती-अ (VJ-A) | ०३% |
| ४. | भटक्या जमाती-ब (NT-B) | २.५% |
| ५. | भटक्या जमाती-क (NT-C) | ३.५% |
| ६. | भटक्या जमाती-ड (NT-D) | ०२% |
| ७. | विशेष मागास प्रवर्ग (SBC) | ०२% |
| ८. | इतर मागासवर्गीय (OBC) | १९% |
| ९) | सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग (SEBC) | १२% |
| १०) | आर्थिक दुर्बल घटक (EWS) | १०% |

**टीप :** *मुंबई महानगर क्षेत्रामधील रायगड जिल्ह्यात येणाऱ्या क्षेत्रासाठी आरक्षण टव स्वतंत्र दर्शविण्यात आलेली आहे.*

### २) कोटानिहाय राखीव जागा

| अ.क्र. | कोटा | अल्पसंख्याक संस्थांच्या उच्च माध्यमिक विद्यालय | |
|---|---|---|---|
| १. | इनहाऊस कोटा | १० % | |
| २. | व्यवस्थापन कोटा | ५ % | |
| ३. | अल्पसंख्याक कोटा | ५० % | |

**टीप :**

१) ज्या संस्थेची माध्यमिक (इ १०वी) शाळा नाही त्यांच्या उच्च माध्यमिक विद्यालयासाठी इनहा

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

श्री शिवाजी मराठा सोसायटी पुणेचे
समाजभूषण बाबुराव उर्फ आप्पासाहेब जेधे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पुणे-२.
आवक क्र. २१८/२०२०-२१
तारीख १८/०८/२०२०
फाईल क्र

परिपत्रक क्र. २२८/२०२०

शैक्षणिक प्रवेशामध्ये पाळावयाच्या आरक्षणाबाबत...

या परिपत्रकाव्दारे सर्व संबंधिताना कळविण्यात येते की, शैक्षणिक प्रवेशामध्ये पाळावयाच्या आरक्षणा सदर्भात शासनाने वेळोवेळी शासन आदेश निर्गमित केलेले आहेत. विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था येथील शैक्षणिक प्रवेशामध्ये आरक्षण धोरणाची अंबलबजावणी करण्याबाबत वेळोवळी सर्व संबंधिताना सूचना देण्यात आलेल्या आहेत. सोबत विद्यापीठ परिपत्रक दि. २७/०६/२०११ व परिपत्रक दि. ३०/०८/२०१९ च्या प्रती सोबत जोडत आहे.

शैक्षणिक वर्ष २०२०–२१ साठी विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था येथे प्रवेश प्रक्रिया सुरू असून अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आरक्षणा संदर्भात केलेल्या तरतुदीनुसार व त्या त्या प्रर्वगासाठी विहित केलेल्या आरक्षणाच्या टक्केवारी नुसार प्रवेशाबाबतची कार्यवाही करणे बंधनकारक आहे. तरी शैक्षणिक प्रवेशामध्ये पाळावयाच्या आरक्षणा संदर्भात शासनाने वेळोवळी निर्गमित केलेल्या शासन आदेशाची काटेकोरपणे अंबलबजावणी व्हावी.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ : शै. प्रवेश/१२३४
दिनांक : ०८/०८/२०२०

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :—

मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
मा. प्राचार्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये
मा. संचालक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक

**विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांमध्ये प्रवेशाकरीता मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) वर्गास जागा आरक्षित ठेवण्याबाबत.**

या परिपत्रकाव्दारे सर्व संबधिताना कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठातील शैक्षणिक संस्थामध्ये विविध अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) वर्गास जागा आरक्षित ठेवण्याबाबत शासनाने शासन परिपत्रक क्र. संकीर्ण—२०१९/प्र.क्र२२/विशि—३ दि.०९ जुलै, २०१९ अन्वये आदेश दिलेले आहेत. सोबत शासन निर्णय व पत्राची प्रत जोडत आहे. तरी सदर शासन निर्णयातील तरतुदींची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी.

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड, पुणे ४११ ००७. )
संदर्भ क्र. शै.प्रवेश/३०१६ )
दिनांक : ३०/०८/२०१९ )

प्रत:

मा. प्राचार्य/संचालक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय/संस्था.

१३२२८

महाराष्ट्र राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गास जागा आरक्षित ठेवण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र. २२/विशि-३
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ०९ जुलै, २०१९.

संदर्भ :-

१. विधी व न्याय विभागाचा सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२, दि. ३० नोव्हेंबर, २०१८.
२. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. १२ फेब्रुवारी, २०१९.
३. विभागाचे समक्रमांकाचे दि. ०८ मार्च, २०१९ रोजीचे शासन परिपत्रक.
४. विधी व न्याय विभागाचा सन २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, दि. ३ जुलै, २०१९.

प्रस्तावना:-

महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) नागरिकांच्या वर्गाच्या प्रगतीसाठी राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरिता जागांच्या आरक्षणासाठी आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांच्या आणि पदांच्या आरक्षणासाठी आणि तत्संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींची तरतुद करण्यासाठीचा अधिनियम उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या दि. ३० नोव्हेंबर, २०१८ च्या राजपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर अधिनियमातील मुद्दा क्र. ४ (१)(क), अन्वये राज्यातील अनुदानित तसेच विनाअनुदानित शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाच्या एकूण १६% जागा मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) नागरिकांच्या प्रवर्गासाठी आरक्षित करण्यात आल्या आहेत. तसेच संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी शासकीय सेवा व शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता १०% जागा आरक्षित करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र. ४ अन्वये शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाबाबतचे आवश्यक आदेश सर्व संबंधीत विभागांनी तात्काळ निर्गमित करण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे. त्यास अनुसरुन राज्यातील अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांखेरीज सर्व सार्वजनिक अकृषी विद्यापीठातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गास १६ % जागा तसेच खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी १०% जागा आरक्षित ठेवण्याबाबत विभागाने संदर्भ क्र. ३ येथील दि. ०८ मार्च, २०१९ रोजी शासन परिपत्रक निर्गमित केले आहे.

तथापि, महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरिता जागांचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे आणि पदांचे) आरक्षण अधिनियम, २०१८ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम उपरोक्त संदर्भ क्र. ४ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या दि. ३ जुलै, २०१९ च्या राजपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर अधिनियमातील मुद्दा क्र. २(क), अन्वये राज्यातील अनुदानित तसेच विनाअनुदानित शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाच्या एकूण १६ % च्याऐवजी १२% जागा मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) नागरिकांच्या प्रवर्गासाठी आरक्षित करण्यात आल्या आहेत. त्यास अनुसरुन सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) नागरिकांच्या वर्गास १२% जागा महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता आरक्षित करण्याबाबत या विभागाच्या अधिनस्त असलेल्या सर्व अकृषी विद्यापीठांना निर्देश देण्याकरिता याबाबतचे शासन परिपत्रक निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक:-

उपरोक्त संदर्भ क्र. ४ ला अनुसरुन महाराष्ट्र राज्यातील सर्व सार्वजनिक अकृषी विद्यापीठातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गास १६% च्या ऐवजी १२% जागा आरक्षित ठेवण्यात याव्यात.

२. संदर्भ क्र ३ येथील शासन परिपत्रकान्वये सूचित केल्याप्रमाणे खुल्या प्रवर्गातील आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी १०% आरक्षित जागा कायम राहतील.

३. शासनाने निर्धारित केलेले शैक्षणिक संस्थातील प्रवेशामधील सदर आरक्षण राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागातंर्गत येणाऱ्या अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थाखेरीज सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, विधी विद्यापीठे, स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे, त्यांच्याशी संलग्नीत असणारी सर्व अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालये व स्वायत्त महाविद्यालये यांना लागू होईल. सदर आदेशाची प्रभावी अंमलबजावणी होईल हे पाहण्याची जबाबदारी संबंधित विद्यापीठांची राहील.

४. शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशासाठी विद्यापीठांनी/संस्थांनी नियम / परिनियम तयार केले असतील आणि त्यामध्ये विविध सामाजिक घटकांचे आरक्षण दर्शविण्यात आले असेल तर या आरक्षणाच्या अनुषंगाने त्या नियमात/ परिनियमात संबंधितांनी विहित कार्यपध्दतीनुसार आवश्यक त्या सुधारणा तातडीने कराव्यात.

५. सर्व विद्यापीठांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरचे परिपत्रक त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व शैक्षणिक संस्थांच्या निदर्शनास आणून द्यावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०७०९१२३५०९६१०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SIDDHARTH KHARAT

(सिध्दार्थ खरात)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे विशेष कार्यअधिकारी, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
६. सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरु / कुलसचिव.
७. सर्व विधि विद्यापीठांचे कुलगुरू/ कुलसचिव.
८. सर्व स्वंय अर्थसहाय्यीत / अभिमत विद्यापीठांचे कुलगुरू/ कुलसचिव
९. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य.
१२. सर्व विभागीय सहसंचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
१३.सह सचिव, (विशि), उप सचिव, (मशि) (तांशि), उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१४. उप सचिव (१६अ), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
१५.निवड नस्ती - कार्यासन विशि-३.

5373
24/08/19

महाराष्ट्र शासन

शिक्षण संचालनालय (उच्चशिक्षण)

महाराष्ट्र राज्य , मध्यवर्ती इमारत, पहिला मजला,पुणे-४११००१.

www.dhepune.gov.in Email.vishi.dhepune@nic.in

क्र-उशिसं/संकीर्ण/एसईबीएस-आरक्षण /वि.शि./२०१९/ 10979 दिनांक

23 AUG 2019

प्रति,

१) मा.कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे

२) विभागीय सहसंचालक,
उच्चशिक्षण, सर्व विभाग.

मा. कुलसचिव यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
प्राप्त /क्र.आ/ 5230
दिनांक - 24/8/19
प्राप्त दिनांक - 24/8/19
विभाग - 26/8/19
(PG)

विषय- महाराष्ट्र राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी ) वर्गास जागा आरक्षित ठेवण्याबाबत.

संदर्भ-१.शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र-संकीर्ण-२०१९/प्र.क्र.२२/विशि-३ दिनांक- ०९ जुलै, २०१९

वरील विषयानुसार सर्व विद्यापीठांना तसेच सर्व विभागीय सहसंचालक, उच्चशिक्षण, सर्व विभाग यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी ) वर्गास जागा आरक्षित ठेवण्याबाबतचा निर्णय शासनाने संदर्भिय निर्णयान्वये घेतला आहे.

तरी सदर शासन निर्णयात देण्यात आलेल्या निर्देशाप्रमाणे मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिदृष्टया मागास वर्गाकरिता १२ % जागा प्रवेशासाठी आरक्षित ठेवण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती. सुलभ संदर्भाकरीता सोबत शासन निर्णयाची प्रत जोडली आहे.

Dy. R. (P.G.)

29.8

( सुयश दुसाने )
प्रशासन अधिकारी
शिक्षण सचालनालय (उच्चशिक्षण)
महाराष्ट्र राज्य,पुणे-१

मा.सचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई यांना माहितीस्तव सादर

भारतीय संविधानानुसार व मंडल आयोगाने
केलेल्या शिफारशीनुसार इतर मागासवर्गीयांना
अकृषि विद्यापीठे व संलग्नित शासकीय/अशासकीय
कला, वाणिज्य/विज्ञान/शिक्षणशास्त्र या शैक्षणिक
संस्थांमधील प्रवेशासाठी आरक्षण

## महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : युएसजी-१४९३/(२४२८)/विशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : २३ जून, १९९४

**वाचा** : १. शासन निर्णय, शिक्षण विभाग क्र. एमआयएस-१०७४/१३०३-एम, दिनांक २७ जून, १९७४.

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९३/२१६७/सीआर-१४१/९३/१६-ब, दिनांक २३ मार्च, १९९४.

३. शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. युएसजी-१४९३ (२४२८)/विशि-४, दि. १० मे, १९९४.

४. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. युएसजी-१४९३/(२४२८)/विशि-४, दि. १३ मे, १९९४.

**शासन निर्णय** : शासन निर्णय, शिक्षण विभाग क्र. एमआयएस-१०७४/१३०३-एम, दिनांक २७ जून, १९७४ अन्वये, शासकीय/अशासकीय शिक्षणसंस्थांमध्ये प्रवेशासाठी खालीलप्रमाणे आरक्षण विहित करण्यात आले आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती आणि नवबौद्ध | १३% |
| २. | अनुसूचित जमाती (विनिर्दिष्ट भागाव्यतिरिक्त इतर भागातील धरून) | ७% |
| ३. | विमुक्त आणि भटक्या जमाती | ४% |
| ४. | इतर मागासवर्गीय | १०% |
| | एकूण | ३४% |

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९३/२१६७/सीआर-१४१/९३/१६-ब, दिनांक २३-३-९४ अन्वये मंडळ आयोगाच्या शिफारशीनुसार इतर मागासवर्गीयांना तसेच विमुक्त जाती व भटक्या जमातीकरिता खालीलप्रमाणे सुधारित आरक्षण विहित करण्यात आले आहे.

| | | |
|---|---|---|
| (अ) | विमुक्त जाती (१४ व तत्सम जाती) | ३% |
| (ब) | भटक्या जमाती (जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जाती) | २.५% |
| (क) | भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती, यादी जोडल्याप्रमाणे) | ३.५% |
| (ड) | भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जमाती, यादी जोडल्याप्रमाणे) | २% |
| (इ) | इतर मागासवर्गीय (ओ.बी.सी.) | १९% |
| | एकूण | ३०% |

३. शैक्षणिकसंस्थांमध्ये प्रवेश देण्यासाठी अपंग, संरक्षण सेवा, अनिवासी भारतीय, भारत सरकारचे नामनिर्देशित उमेदवार वगैरे विविध गटांकरितासुद्धा आरक्षण असते. तेव्हा या सर्व बाबींचा विचार करून मागासवर्गीयांच्या घटनेत मान्य गटाकरिता १९९४-९५ या शैक्षणिक वर्षापासून शासकीय/अशासकीय, अनुदानित व विना अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र इत्यादि संस्थांमध्ये खालीलप्रमाणे राखीव जागांचे प्रमाण विहित करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती व अनुसूचित जातींमधील बौद्धधर्म स्वीकारलेल्या व्यक्ती | १३% |
| २. | अनुसूचित जमाती | ७% |
| ३. | विमुक्त जाती (१४ तत्सम जाती) | ३% |
| ४. | भटक्या जमाती (जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जाती) | २.५% |
| ५. | भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती, यादी जोडल्याप्रमाणे) | ३.५% |
| ६. | भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जमाती, यादी जोडल्याप्रमाणे) | २% |
| ७. | इतर मागासवर्गीयांकरिता (ओ.बी.सी.) | १९% |
| | एकूण | ५०% |

४. सदर आरक्षण प्रत्येक संस्थेमध्ये अभ्यासक्रमनिहाय असेल आणि ते मुक्त आणि गुणवत्ताधारित जागांखेरीज त्यांच्या त्यांच्या प्रमाणात असेल.

५. आरक्षित जागा या प्रथमतः भरण्यात याव्यात. मात्र आरक्षित जागांवर प्रवेश मिळाला तरी गुणवत्तेनुसार त्या उमेदवाराच्या अभ्यासक्रम किंवा संस्था याबाबतच्या काही किंवा सर्व पसंती बदलण्या सर्वांकरिता अराखीव जागामधून प्रवेश देण्यासाठी त्याच्या विनंतीनुसार पुनर्विचार करण्यात यावा.

६. शैक्षणिकसंस्थामध्ये प्रवेश देताना एखाद्या प्रवर्गाचा उमेदवार न मिळाल्यास ते आरक्षण अनुशेष म्हणून पुढे ओढण्यात येत नसल्यामुळे व ते त्याच वर्षी भरावयाचे असल्यामुळे मागासवर्गांच्या इतर गटातील उमेदवारांना प्रवेश देऊन आरक्षण पूर्ण करण्यात यावे. यासाठी दिनांक २७ जून, १९७४ च्या परिपत्रक २ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार कार्यवाही करण्यात यावी. मात्र अदलाबदलीने इतर गटांतून भरण्याची तरतूद करताना अशाप्रकारे उपलब्ध मागासवर्गीयांची संख्या मूळ आरक्षण अधिक अदलाबदलीने आलेले विद्यार्थी यांची संख्या एकूण ५०% पेक्षा अधिक असणार नाही.

७. मंडल आयोगाच्या शिफारशीनुसार "क्रीमीलेयर" चे तत्त्व केंद्र शासनाने मान्य केले आहे. यासदर्भात सविस्तर आदेश, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभागाकडून निर्गमित करण्यात आलेले आहेत. समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभागाच्या आदेशाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ना. ना. कांबळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

भटक्या जमाती "क"

धनगर व त्यांच्या तत्सम जातींची यादी

धनगर :—(१) अहिर, (२) डांगे, (३) गडारी, (४) हंडे, (५) तेलवर, (६) हटकर (७) हाटकर, (८) शेगर, (९) खुटेकर, (१०) तेलंगी, (११) तेल्लारी, (१२) कोकणी-धनगर, (१३) कानडे, (१४) वऱ्हाडे-धनगर, (१५) झाडे, (१६) झेंडे, (१७) कुरमार, (१८) माहुरे, (१९) लाडसे, (२०) सनगर, (२१) धनगर.

(सीबीसी–१०८९/(२०३)/मावक–५, दि. २५ मे, १९९० अन्वये)

भटक्या जमाती "ड"

वंजारी व तत्सम जातींची यादी

वंजार, वंजारा, वंजारी.

पु.वि.मु.—५००–८–९५ (११२०)

उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन
विभागाच्या अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक
संस्थांमधून " विशेष मागास प्रवर्गाकरिता "
राखीव जागा ठेवण्याबाबत

## महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक : युएसजी–१४९३/(२४२८)–विशि–४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई–४०० ०३२

दिनांक : २२ जून, १९९५

**वाचा** : (१) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. युएसजी–१४९३/२४२८/विशि–४, दि. २३ जून, १९९४ व समक्रमांकित शुद्धिपत्रक दिनांक–जुलै १९९४.

(२) शासन निर्णय, समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्र. सीबीसी–१४९४/प्र. क्र. २३६/मावक–५ दिनांक १३ जून, ९५ व समक्रमांकित शुद्धिपत्रक दिनांक १५ जून, १९९५.

(३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी–१०९४/प्र. क्र. ६८/९४/१६–ब, दिनांक १५ जून, १९९५.

१. **शासन निर्णय** : राज्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती म्हणून विवक्षितपणे घोषित करण्यात आलेले जनसमुदाय वगळता अन्य काही जातीजमातीकडून सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या कारणावरून विशेष सवलत देण्याची मागणी लक्षात घेता, शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक सीबीसी–१४९४/प्र. क्र. २३६/मावक–५, दिनांक १३ जून, १९९५ व समक्रमांकित शुद्धिपत्रक दिनांक १५ जून, १९९५ मध्ये विशिष्ट जातींचा " विशेष मागास प्रवर्ग " यामध्ये समावेश करण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. ज्या जातींचा " विशेष मागास प्रवर्ग " मध्ये समावेश करण्यात आला आहे त्याची यादी परिशिष्ट " अ " मध्ये देण्यात आली आहे.

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी–१०९४/प्र. क्र. ६८/९४/१६–ब दिनांक १५ जून, १९९५ अन्वये " विशेष मागास प्रवर्गा " साठी २% आरक्षण शासकीय/निमशासकीय सेवेत ठेवण्याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत.

३. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. युएसजी–१४९३/(२४२८) विशि–४, दिनांक २३ जून, १९९४ व समक्रमांकित शुद्धिपत्र दिनांक–जुलै, ९४ अन्वये इतर मागास वर्गासाठी अकृषि विद्यापीठे व संलग्नित शासकीय/अशासकीय कला, विज्ञान, वाणिज्य, शिक्षणशास्त्र व इतर शैक्षणिक संस्था यामधून प्रवेशासाठी आरक्षण ठेवण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. या आदेशानुसार शैक्षणिक संस्थांमध्ये राखीव जागा ५०% या प्रमाणात ठेवण्यात आलेल्या आहेत. आता काही विशिष्ट जाती जमातींचा " विशेष मागास प्रवर्गा " त समावेश करण्यात आलेला असल्यामुळे या प्रवर्गाकरिता २% जागा उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्थांमधून या आदेशान्वये राखून ठेवण्यात येत आहे. " विशेष मागास प्रवर्गा " करिता राखून ठेवण्यात आलेल्या २% जागा वाढल्याने आता शैक्षणिक संस्थांमधून राखीव जागांचे प्रमाण खालीलप्रमाणे राहील :

| | | |
|---|---|---|
| (१) | अनुसूचित जाती व अनुसूचित जाती मधील बौद्धधर्म स्वीकारलेल्या व्यक्ती | १३% |
| (२) | अनुसूचित जमाती | ७% |
| (३) | विमुक्त जाती (१४ तत्सम जाती) | ३% |
| (४) | भटक्या जमाती (जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जाती) | २.५% |
| (५) | भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती) | ३.५% |
| (६) | भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जमाती) | २% |
| (७) | इतर मागास वर्गीयांकरिता (ओ. बी. सी.) | १९% |
| (८) | विशेष मागास प्रवर्ग | २% |
| | एकूण | ५२% |

हे आदेश १९९५–९६ या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात येत आहेत.

४. सदर आरक्षण प्रत्येक संस्थांमध्ये अभ्यासक्रम निहाय असेल आणि ते मुक्त आणि मूल्याधारित भागाकरिता त्यांच्या त्यांच्या प्रमाणात असेल.

आरक्षित जागा या प्रथमतः भरण्यात याव्यात. मात्र आरक्षित जागांवर प्रवेश मिळाला तरी गुणवत्तेनुसार त्या उमेदवारांच्या अभ्यासक्रम किंवा संस्था याबाबतच्या काही किंवा सर्व फक्त वरच्या पसंतीकरीता अराखीव जागांमधून प्रवेश देण्यासाठी त्यांच्या विनंतीनुसार पुनर्विचार करण्यात यावा.

५. शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश देताना एखादा प्रवर्गाचा उमेदवार न मिळाल्यास ते आरक्षण अनुशेष म्हणून पुढे ओढण्यास येत नसल्यामुळे व ते त्याच वर्षी भरावयाचे असल्यामुळे मागासवर्गीयांच्या इतर गटातील उमेदवारांना प्रवेश देऊन आरक्षण पूर्ण करण्यात यावे. यासाठी दिनांक २७ जून, १९७४ च्या परिच्छेद २ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्यात यावी. मात्र अदलाबदलीने इतर प्रवर्गातून भरण्याची तरतूद करताना अशा तऱ्हेने उपलब्ध मागासवर्गीयांची संख्या मूळ आरक्षण अधिक अदलाबदलीने झालेले विद्यार्थी यांची संख्या धरून ५२% पेक्षा अधिक असणार नाही.

६. शैक्षणिक वर्ष १९९५–९६ सुरु असल्यामुळे "विशेष मागास प्रवर्गा" त असणाऱ्या जातीमधून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता त्यांनी ३१ जुलै, १९९५ पर्यंत शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्र. सीबीसी–१४९४/प्र. क्र. २३६/मावक–५, दिनांक १३ जून, १९९५ च्या जोडलेल्या परिशिष्ट "ब" मधील विवरण पत्रात जातीचे प्रमाणपत्र सक्षम अधिकाऱ्याकडून घेऊन संबंधित संस्थाप्रमुखाकडे सादर करणे बंधनकारक राहील. वरील तारखेपर्यंत जर या प्रवर्गातील विद्यार्थी त्यांच्या जातीचे प्रमाणपत्र शैक्षणिक संस्थाप्रमुखाला सादर करू शकले नाहीत तर, त्यांचा या सवलीत आधारावर हक्क राहणार नाही. याचीही नोंद घेणे आवश्यक आहे.

७. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना विनंती करण्यात येते की, हे आदेश सर्व शैक्षणिक संस्थाचालकांच्या निदर्शनास आणून द्यावेत.

हे आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या व समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभागाच्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

शि. म. सेन
उप सचिव, महाराष्ट्र शासन

## परिशिष्ट—"अ"

शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक सीबीसी–१४९४/प्र. क्र. २३६/मावक–५, दिनांक १३ जून, १९९५ व समक्रमांकित शुद्धिपत्र दिनांक १५ जून, १९९५ अन्वये "विशेष मागास प्रवर्ग" अंतर्गत करण्यात आलेली जातींची यादी.

अ. क्र. — जातीचे नाव

१. गावारी, गवारी.
२. माना.
३. (१) कोष्टी, (२) हलबा कोष्टी, (३) हलबा जात, (४) साळी, (५) लाडकोष्टी, (६) गढेवाल कोष्टी, (७) देशकर, (८) सालेवार, (९) पद्मशाली, (१०) देवांग, (११) कारची बंध, (१२) पटवीस, (१३) सतसाळे, (१४) स्वाडे, (१५) जैनकोष्टी.
४. (१) कोळी, तत्सम जाती, (२) मच्छिमार कोळी, (३) अहीर कोळी, (४) खानदेशी कोळी, (५) पानकोळी, (६) ख्रिश्चन कोळी, (७) वुबळे कोळी, (८) पानभरे कोळी, (९) सूर्यवंशी कोळी, (१०) मगिला कोळी, (११) सोनकोळी, (१२) वैती कोळी, (१३) खारवी, (१४) अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट नसलेले कोळी.
५. (१) मुन्नेरवार, (२) मुन्नूरवार, (३) मुन्नुर, (४) तेलगु मुन्नुर, (५) मुन्नुरवार तेलगु, (६) मुन्नरकापू, (७) कापेवार, (८) तेलगु कापेवार, (९) मुन्नरवाड, (१०) तेलगु फुलमाळी, या जाती.

## पुणे विद्यापीठ, पुणे ७

संदर्भ क्र. आरक्षण / ४२ / ५३३

आरक्षण कक्ष
दिनांक : २२–७–९५.

मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये,
सर्व मान्यताप्राप्त संस्था.

महोदय,

वरील शासन निर्णय आपणाकडे माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठवीत आहे.

कळावे,

आपला विश्वासू,
सही/–
उपकुलसचिव,
आरक्षण कक्ष

पु.वि.मु.–५००–८–९५ (१०६९)

उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभागाच्या
अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्थामधून
मागास प्रवर्गाकरिता राखीव जागा ठेवण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग**

**शासन शुद्धिपत्र क्रमांक - यूएसजी-१४९३/[२४२८]/विशि-४**

**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.**

दिनांक : ७ फेब्रुवारी, १९९६

वाचा :—(१) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. यूएसजी-१४९३/२४२८/विशि-४, दि. २३ जून, १९९४ व समक्रमांकित शुद्धिपत्र दिनांक १२ जुलै, १९९४

(२) शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक - सीबीसी-१४९४/प्र. क्र. २३६/मावक-५, दि. १३ जून, १९९५ व समक्रमांकित शुद्धिपत्रक दि. १५ जून १९९५.

(३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९४/प्र. क्र. ६८/९४/१६-ब, दिनांक १५ जून १९९५

(४) शासन निर्णय, क्रमांक-यूएसजी-१४९३/[२४२८]/विशि-४, दिनांक २२ जून १९९५.

**शासन शुद्धिपत्रक :** शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्रमांक-यूएसजी-१४९३/[२४२८]/विशि-४, दि. २२ जून १९९५ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत

२ परिच्छेद-४ : सदर आरक्षण प्रत्येक संस्थेमध्ये अभ्यासक्रमनिहाय असेल आणि ते मुक्त आणि मूल्याधारित जागांकरिता त्यांच्या त्यांच्या प्रमाणात असेल.

तंत्रशिक्षण विभाग वगळता इतर शैक्षणिक विभागांतर्गत येणाऱ्या बिगरराखीव जागा या प्रथमतः भरण्यात याव्यात यामध्ये गुणवत्तेनुसार असणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांचादेखील समावेश अराखीव उमेदवार म्हणून असेल. या विद्यार्थ्यांना समावेश आरक्षणामध्ये करण्यात येऊ नये. यासाठी विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश अराखीव म्हणून समजण्यासाठी पसंती कळविण्याचा प्रश्न उद्भवत नाही. उर्वरित जागा आरक्षणानुसार भरण्यात याव्यात, असे करताना शैक्षणिक संस्थांमध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे प्रमाण ५२% पेक्षा अधिक झाले तर त्यास कोणतीही हरकत नाही.

परिच्छेद-५ मधील "मात्र बदलाबदलीने इतर प्रवर्गातून/मधून ५२% पेक्षा अधिक असणार नाही" हे शेवटचे वाक्य पूर्णतः वगळण्यात यावे.

४. हे शुद्धिपत्रक सामान्य प्रशासन विभागाच्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहे

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

सही/- **अ. मा. भट्टलवार**
**अवरसचिव, महाराष्ट्र शासन**

**पुणे विद्यापीठ**
**पुणे-७**

आरक्षण कक्ष

संदर्भ : आरक्षण/४२/१२५

दि. ४-३-९६

मा. प्राचार्य/मा. संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था.

महोदय,

वरील शासन निर्णय आपणाकडे माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठवीत आहे

आपला विश्वासू,

कळावे

सही/-
उपकुलसचिव (आरक्षण कक्ष)

पु वि मु —५००—३—९६ (२८५४) [m-3]

युवक व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभागातील
अभियांत्रिकी सर्व तंत्र शिक्षण संस्थांमधून
" विशेष मागास प्रवर्गाकरिता " राखीव जागा
ठेवण्याबाबत.

## महाराष्ट्र शासन

युवक व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग
शासन शुद्धिपत्रक क्रमांक विशप्रग १३९५/११४०७/(६९४०) तांशि १
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई–४०० ०३२
दिनांक २१ मार्च, १९९६

संदर्भ :—(१) शासन निर्णय, युवक व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग
क्रमांक : युतनी १४९३/(२४२८) विशि–४
दिनांक २२ जून, १९९५

शासन शुद्धिपत्रक :—

संदर्भाधीन दिनांक २२ जून, १९९५ च्या शासन निर्णयान्वये शासकीय/अनुदानित/विद्यापीठ व्यवस्थापित/विना अनुदानित संस्थांतील अभियांत्रिकी/वास्तुशास्त्र/औषधनिर्माण शास्त्र वा व्यवस्थापन शास्त्र इत्यादी व्यावसायिक विद्याशाखांच्या पदवी/पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात प्रवेश करण्यासाठी मागासवर्गीयांकरिता आरक्षणाचे प्रमाण शासनाने यापूर्वीच खालीलप्रमाणे विहित केले आहे.

| | | |
|---|---|---|
| (१) | अनुसूचित जाती व अनुसूचित जातीतील बौद्ध धर्म स्वीकारलेल्या व्यक्ती | १३ टक्के |
| (२) | अनुसूचित जमाती | ७ टक्के |
| (३) | विमुक्त जाती (१४ तत्सम जाती) | ३ टक्के |
| (४) | भटक्या जमाती (जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जमाती) | २.५ टक्के |
| (५) | भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती) | ३.५ टक्के |
| (६) | भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जमाती) | २ टक्के |
| (७) | इतर मागासवर्गीय (ओ.बी.सी.) | १९ टक्के |
| (८) | विशेष मागासवर्गीय प्रवर्ग (एस.बी.सी) | २ टक्के |
| | एकूण : | ५२ टक्के |

संदर्भाधीन दिनांक २२ जून, १९९५ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ४, ५ व ६ मध्ये खालील-प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत :—

१. परिच्छेद क्र. ४ :—उपरोक्त आरक्षण प्रत्येक संस्थेत अभ्यासक्रमनिहाय असेल व ज्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश पद्धतीत मुक्त व मुल्यमापित प्रकाराच्या जागा असतात त्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशा-साठी प्रत्येक प्रकारास त्या त्या प्रमाणात लागू पडेल.

परिच्छेद क्र. ५ :—संवर्गनिहाय आरक्षित जागा प्रथमतः भरण्यात याव्यात. एखाद्या मागासवर्गीय संवर्गातून उमेदवार उपलब्ध नसतील तर त्या संवर्गातील रिक्त जागा उर्वरीत संवर्गांच्या एकत्रित यादीतील गुणवत्तानुक्रमानुसार पूर्व नियोजित वेळी उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांचा त्यांच्या विनंतीवरुन दुसऱ्या चांगल्या पसंतीच्या जागेवर प्रवेश बदल देण्यासाठी पुर्नविचार करण्यात यावा.

मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या जागांवर प्रवेश घेतलेले उमेदवार सर्वसाधारण गुणवत्तानु-क्रमानुसार खुल्या जागावरील प्रवेशासाठी देखील पात्र राहतील. खुल्या जागेवर प्रवेश देताना पूर्वीची संस्था अभ्यासक्रम समत अबाधित राहत असेल तर सर्व सवलतींसह अशा प्रवेशाची समस्तरवालट करण्यात येऊन अशा उमेदवारांना खुल्या जागावर प्रवेश मिळाला आहे असे समजण्यात यावे. त्यासाठी उमेदवाराने उपस्थित राहण्याची किंवा पसंती/इच्छा कळविण्याचा प्रश्न उद्भवणार नाही. परंतु राखीव जागेवर प्रवेश झाला त्याठिकाणी स्वतःचे पसंतीनुसार उपलब्ध नसलेल्या जागेवर खुल्या संवर्गातून प्रवेश मिळण्यासाठी पुर्नविचार व्हावा अशी इच्छा असेल तर मात्र उमेदवारास खुल्या जागांसाठी होणाऱ्या प्रवेश प्रक्रियेच्या पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार आपल्या सर्वसामान्य गुणवत्तानुक्रमानुसार उपस्थित राहणे आवश्यक राहील. अन्यथा अशा प्रवेश पालटासाठी त्यांचा पुर्नविचार करता येणार नाही.

परिच्छेद क्र. ६ :—मागासवर्गीय उमेदवारांचे सर्वसाधारण गुणवत्तानुक्रमानुसार खुल्या जागांसाठी प्रवेश करताना संस्थेत/अभ्यासक्रमात मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे प्रमाण शासन निर्धारित प्रमाणापेक्षा अधिक झाले तर त्यास कोणतीही हरकत राहणार नाही.

२. हे शुद्धिपत्रक सामान्य प्रशासन विभागाच्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(ओ. शि. विहाडे)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

पुणे विद्यापीठ, पुणे ७

आरक्षण कक्ष
दिनांक : ८–७–९६.

संदर्भ क्र आरक्षण / ४२ / ३७०

मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये, / मान्यताप्राप्त संस्था.

महोदय,

वरील शासन निर्णय आपणाकडे माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठवीत आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

सही/–

उपकुलसचिव

संवैधानिक आरक्षण ५० टक्क्यांच्या आत
ठेवणे व [illegible]

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग.
शासन निर्णय क्र. टीईएम ३३९७/१२१२६/(३०८६)/तांशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.
दिनांक : ११ जुलै, १९९७.

संदर्भ:- १) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र.टीईएम १०९३/[illegible]/तांशि-६, दि.२२ जून,१९९४ व समक्रमांकित शुध्दिपत्रक दि. जुलै,१९९४.

२) शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग क्र.सीबीसी १४९४/प्र.क्र.-१२/ मावक-५, दि.१३ जून,१९९५ व समक्रमांकित शुध्दिपत्रक दि.१४ जून,१९९५.

३) शासन निर्णय क्र.सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी १०९४/प्र.क्र.८८/९४/१६-ब, दि.१५ जून, १९९५ व शुध्दिपत्रक दि.२१ मार्च,१९९६.

४) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र.टीईएम १९९३/(२४२८)/तांशि-६, दि.२२ जून, १९९५.

५) अतिरिक्त सरकारी वकील, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र. [illegible], दि.१०.८.१९९६.

**प्रस्तावना:-**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी १०९३/१६७/सीआर-१४१/९३/१३/१६-ब, दि. २३ मार्च, १९९४ अन्वये विविध मागास प्रवर्गासाठी एकूण ५० टक्के आरक्षण विहित करण्यात आले होते. नंतर सामाजिकदृष्ट्या व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या काही जातींच्या विकासासाठी काही सवलती व उपाययोजना करणे आवश्यक असल्यामुळे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी १०९४/प्र.क्र.८८/९४/१६-ब, दि.८ डिसेंबर, १९९४ चे परिशिष्ट अ मध्ये नमूद केलेल्या जातींसाठी एक स्वतंत्र 'विशेष मागास प्रवर्ग' असे संबोधण्यात येऊन त्यांच्यासाठी २ (दोन) टक्के आरक्षण ठेवण्यात आले होते. तसेच या प्रवर्गासाठी क्रिमीलेयरचे तत्व लागू नाही हेही स्पष्ट करण्यात आले होते.

दि. ८ डिसेंबर, १९९४ च्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन आदेशास अनुसरून उच्च व तंत्रशिक्षण विभागाने 'विशेष मागास प्रवर्गासाठी' २ टक्के आरक्षण देऊन शासन निर्णय क्र.टीईएम १९९३/ (२४२८)/तांशि-४, दि.२२ जून, १९९५ अन्वये विविध आरक्षणाबाबत आदेश निर्गमित केले आहेत. सदर निर्णयाद्वारे विशेष मागास प्रवर्गासाठी २ टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आली असून एकूण आरक्षण ५२ टक्के विहित केले आहे.

'भारतीय संविधान अनुच्छेद १४ तसेच १६ अन्वये सर्व प्रवर्गातील घटकांना समानता व समान संधी मिळावी' म्हणून मा. सर्वोच्च न्यायालयाने १९९३ साली मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षण ५० टक्क्यांपेक्षा जास्त असू नये असा निवाडा दिला आहे.

रिट याचिका क्र. २९८९/१९९७, श्री. पांडुरंग एस. पचाले विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर, या प्रकरणी सुनावणी सुरु असताना मा. उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या १९९७-९८ या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश नियमावलीत संवैधानिक आरक्षणासाठी केलेली ५२ टक्के जागांची तरतूद मा. सर्वोच्च न्यायालयाने इंद्रा सॉहनी विरुद्ध केंद्र या प्रकरणी १९९३ साली दिलेल्या निवाड्यानुसार नसल्यामुळे कायदेशीर नसल्याचे शासनाचे निदर्शनास आणून दिले आहे. (संदर्भ: १९९३-मा. सर्वोच्च न्यायालय ए.आर.-पृ.क्र.४७७, शीर्ष टिप्पणी (डब्ल्यू) प्रवेश नियमावलीतील राज्य शासनाने संवैधानिक आरक्षणासाठी केलेली ५२ टक्के जागांची तरतूद ही मा. सर्वोच्च न्यायालयाचा अवमान ठरू शकते असेही मा. उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. यावर संवैधानिक आरक्षणाचे प्रमाण ५२ टक्क्यांवरून ५० टक्के करण्याबाबतचे आदेश तात्काळ निर्गमित करण्यात येतील असे शासनाने प्रतिपादन केल्यानंतर मा. उच्च न्यायालयाने समाधान व्यक्त केले असून उपरोक्त संदर्भात शासन आता खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## शासन निर्णय:-

शासन आता या शासन निर्णयाद्वारे असे आदेश देत आहे की, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली येत असलेल्या सर्व शैक्षणिक संस्थांतील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी या विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र. मुप्रजी १४९३/(२४२८)/विशि-४, दि.२२ जून, १९९५ अन्वये विशेष मागास प्रवर्गाकरिता राखून ठेवण्यात आलेल्या २ टक्के जागांचे आरक्षणाबाबत पुढील आदेशापर्यंत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे. हे आदेश १९९७-९८ या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात येत असून तात्काळ अंमलात येतील व उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत शैक्षणिक संस्थांतील सर्व विद्या शाखांतील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी लागू राहतील.

१. विशेष मागास प्रवर्गात ज्या जाती आहेत त्यापैकी काही जाती इतर मागासवर्गीयांमध्ये समाविष्ट होत्या. त्यामुळे पूर्वीच्या विशेष मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र धारक उमेदवाराची जात ज्या मागास प्रवर्गामध्ये समाविष्ट होती, त्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणासाठी पात्र समजण्यात यावी.

२. भारतीय संविधानानुसार मंडल आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र.टीईएम १०२४/(६३०३)/तांशि-१, दि.३ जून, १९९४ मधील परिच्छेद क्र.४ मध्ये विहित केल्याप्रमाणे एकूण ५० टक्के जागा आरक्षित करण्यात याव्यात. सदर आरक्षण प्रत्येक संस्थेमध्ये अभ्यासक्रम निहाय राहील. मुक्त (मेरीट सीटस्) तसेच मूल्याधारित (पेमेंट सीटस्) जागांकरिता त्यांच्या त्यांच्या प्रमाणात

अन्वये

३. गुणवत्ता यादीनुसार प्रवेश प्रक्रिया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्या तर त्या जागांवर एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त २ टक्के पर्यंत प्रवेशासाठी विशेष मागास प्रवर्गीय उमेदवारांना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात यावे.

४. रिक्त जागांवर विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना कमाल २ टक्के जागांवर प्रवेश दिल्यानंतर जर जागा रिक्त राहिल्या तर त्या जागा इतर सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांची गुणवत्तेनुसार सरमिसळ करून भरण्यात याव्यात.

३. शासन यापुढे असेही आदेश देत आहे की, १९९७-९८ या शैक्षणिक वर्षासाठी ज्या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असेल व दि.१.७.१९९७ रोजी किंवा तत्पूर्वी या विभागाच्या दि.२२ जून, १९९५ च्या शासन निर्णयानुसार प्रवेश देण्यात आले असतील तर त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी:-

१. विशेष मागासवर्ग प्रवर्गांतर्गत करण्यात आलेल्या प्रवेशास बाधा न आणता पुढील प्रवेश प्रक्रियेत काही कारणास्तव होणाऱ्या रिक्त जागांवर ५० टक्के आरक्षित जागा पुढ्ढ्न घ्याव्यात.

२. संवैधानिक आरक्षण कुठल्याही परिस्थितीत ५० टक्क्यांपेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( ओं. शि. विहांडे )
शासनाचे सहसचिव.

पुणे विद्यापीठ, गणेशखिंड
पुणे - ४११ ००७.

आरक्षण कक्ष
दि २२.७.९७

संदर्भ :- आरक्षण/४७/१८७३

प्रति,

१. मा.प्राचार्य/संस्था प्रमुख, सर्व महाविद्यालये, सर्व मान्यताप्राप्त संस्था
२. मा.विभाग प्रमुख,सर्व शैक्षणिक विभाग,पुणे विद्यापीठ, पुणे - ७.
३. मा.उपकुलसचिव, शैक्षणिक [illegible] पुणे विद्यापीठ, पुणे - ७.

महोदय,

वरील शासन निर्णय आपणाकडे माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठवीत आहे. त्याची तातडीने अंमलबजावणी व्हावी ही विनंती.

आपला विश्वासू,
सही/-

महाराष्ट्र राज्यातील सर्व पारंपारिक विद्यापीठे व त्यांना संलग्नित असलेल्या महाविद्यालयांतील पदवी अभ्यासक्रमाकरिता महिलांसाठी 30 टक्के आरक्षण ठेवण्याबाबत.

## महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. जीईसी-1000/(123/2000)/तांशि-1
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - 400032.
दिनांक : 17 एप्रिल, 2000

**प्रस्तावना :**

भारताच्या संविधानात स्त्री-पुरुष भेद न ठेवता समानतेचे तत्व हा नागरिकांचा मूलभूत हक्क मानण्यात आला आहे. तसेच महिलांच्या बाबतीतही घटनेत सकारात्मक धोरण स्विकारण्यात आले आहे. महिलांना पुरुषांच्या बरोबरीने संधी देणे अपेक्षित असले तरी विविध शिक्षण अभ्यासक्रमाकरिता स्त्रियांना समान संधी प्रत्यक्षात मिळत नाही. स्त्रियांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी त्यादृष्टीने खरा प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यानुसार महिलांचे बलशालीकरण आणि समाजाच्या सर्व क्षेत्रामध्ये महिलांचा सक्रिय सहभाग करुन सर्वांगीण मानवी विकासाच्या विविध क्षेत्रामध्ये सकारात्मक परिणाम घडवून आणण्यासाठी महिलांच्या शिक्षणाकडे जाणिवपूर्वक लक्ष देणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेवून शासन निर्णय दि. 22/6/1994 अन्वये शासनाने महिलांना शासकीय नोकरीमध्ये 30 टक्के जागा आरक्षित ठेवल्या आहेत. यामागील खरा हेतू साध्य होण्याकरिता आता महिलांना पदवी अभ्यासक्रमाकरिता 30 टक्के आरक्षण ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात पदवी स्तरावरील सर्व अभ्यासक्रमांकरिता महिलांसाठी 30 टक्के आरक्षण ठेवण्याबाबत शासनाचा विचार होता.

**शासन निर्णय :**

वरील सर्व वस्तुस्थिती विचारात घेवून शासन आता असे आदेश देत आहे की, महाराष्ट्र राज्यातील सर्व पारंपारिक विद्यापीठे व त्यांना संलग्नित असलेल्या सर्व शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांतील पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशांकरिता महिलांसाठी 30 टक्के आरक्षण ठेवण्यात येत आहे.

सदरचे आरक्षण बिनराखीव व राखीव या दोन्ही प्रवर्गासाठी लागू राहील. जर बिनराखीव जागा 100 असतील तर त्यापैकी 30 जागा महिलांकरिता आरक्षित राहतील.

तसेच सदरचे आरक्षण हे सध्या विविध सामाजिक प्रवर्गांकरिता विहित केलेल्या संविधानात्मक राखीव जागा अंतर्गत समांतर आरक्षण (Horizontal) राहील. उदाहरणार्थ जसे की, सध्या संविधानातील तरतुदीनुसार शासनाने अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता 13 टक्के जागा आरक्षित आहेत. त्यापैकी त्यातील 30 टक्के आरक्षण हे अनुसूचित जाती या प्रवर्गातील महिला उमेदवारांकरिताच ठेवण्यात येईल व जर या प्रवर्गातील किमान पात्रता असलेल्या महिला उमेदवार प्राप्त न झाल्यास त्या जागा अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील पुरुष संवर्गातून भरण्यात येतील. म्हणजेच जर प्रवेशाकरिता एखाद्या विद्याशाखेसाठी प्रथम वर्षासाठी 100 जागा असतील तर त्यापैकी 13 जागा अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील उमेदवारांकरिता सध्या असलेले आरक्षण विचारात घेवून त्यापैकी 30 टक्के म्हणजेच 4 जागा ह्या अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील महिला उमेदवारांकरिता आरक्षित राहतील.

वर उल्लेखिलेल्या पद्धतीप्रमाणे इतर सर्व प्रवर्गांकरिताही सध्या असलेल्या आरक्षणांतर्गत महिलांना 30 टक्के समांतरपणे आरक्षण देण्यात येईल. तसेच ज्या पदवी अभ्यासक्रमांकरिता मूल्याधारीत व मुक्त जागांवर देण्यात येतात त्या प्रवेशांतर्गत देखील 30 टक्के आरक्षण महिलांकरिता देण्यात येईल.

सध्या सर्व तंत्र निकेतनांमध्ये पदविका अभ्यासक्रमासाठी महिलांकरिता शासन निर्णय क्र. इक्युडीपी-1095/(2719)/तांशि-5, दि. 17/1/1996 अन्वये ठेवलेल्या 25 टक्के आरक्षणात वाढ करून आता ते 30 टक्के इतके करण्यात येत आहे.

सदरच्या आरक्षित जागांवर जर महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत तर या रिक्त जागा त्याच शैक्षणिक वर्षात पुरुष संवर्गातून भरण्यात येतील व या रिक्त जागांचा त्या पुढील शैक्षणिक वर्षात अनुशेष धरला जाणार नाही.

वैद्यकीय शिक्षण विभाग आणि कृषि व पदुम विभागांतर्गत येणा-या सर्व पदवी अभ्यासक्रमांकरिता आदेश संबंधित विभागांकडून स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

सदरचे आरक्षणविषयक आदेश शैक्षणिक वर्ष सन 2000-2001 पासून अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही

(प्र. ह. क्षीरसागर)
शासनाचे सहसचिव

---

**पुणे विद्यापीठ**

संदर्भ क्र. आरक्षण/42/239

दिनांक : 17/5/2000

1) मा. प्राचार्य/मा. संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था.

2) मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, पुणे विद्यापीठ.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय आपणांकडे माहितीसाठी आणि योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठवित आहे.

आपला विश्वासू,

उपकुलसचिव,
आरक्षण कक्ष

Kes 1

(437)

Ph. D. ... Unit
Issue No. 5209
Date 20/8/2001

महाराष्ट्र शासन

क्रमांक जीईसी १०००/(१२३/२०००)तांशि.१
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२
दिनांक :- ८ ऑगस्ट. २००१

प्रति,
सहाय्यक कुलसचिव (शै.प्रवेश)
पुणे विद्यापीठ,
पुणे

विषय:- महिला आरक्षणासंबंधी..

महोदय,

उपरोक्त विषयावरील आपण आपले क्रमांक शैक्षणिक प्रवेश २८०७, दिनांक २.७.२००१ चे पत्र कृपया पहावे.

२ महाराष्ट्र राज्यातील सर्व पारंपारिक विद्यापीठे व त्यांना संलग्नीत असलेल्या महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमाकरिता महिलांसाठी ३० टक्के आरक्षण ठेवण्याबाबत शासन निर्णय, क्रमांक जीईसी १०००/(१२३/२०००)तांशि.१, दिनांक १७ एप्रिल, २००० अन्वये आदेश देण्यात आलेले आहेत. सदर आदेश फक्त पदवी स्तरावरील अभ्यासक्रमाकरिता लागू आहेत.

आपला विश्वासू,
(signature)
( एम.र. चौरे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

(103)

F.NO.4-1/2001 U-5
Government of India
Ministry of Human Resource Development
(Deptt. of Secondary & Higher Education)

New Delhi the 13th, December, 2002

To,
The Secretary,
University Grants Commission,
Bahadur Shah Zafar Marg,
**NEW DELHI 110001.**

Sub : Reservation of seats for persons with Disabilities in admission.

Sir,

I am directed to enclose herewith a copy of the letter received from the office of the Chief Commissioner for Disabilities Ministry of Social Justice & Empowerment dated 12/11/2002 alongwith Supreme Court order dated 11/9/2002 and 18/9/2002. Necessary instructions to all the concerned organizations institutions may please be issued for compliance of the directions of the Hon'ble Supreme Court under intimation to this Department as well as office of the Chief Commissioner for Disabilities Ministry of Social Justice & Empowerment.

Yours faithfully,

(S. R. DOGRA)
Under Secretary

---

Office of the Chief Commissioner for Disabilities
Ministry of Social Justice & Empowerment
Government of India

12/11/2002

F.No. DL/A/CCD/2002/

To,
**Secretary**
Ministry of HRD
Shastri Bhawan, New Delhi.

Sub : Reservation of seats for persons with Disabilities in admission.

Sir,

I am directed to say that some of the Hon'ble High Courts had given the ruling that Sec. 39 of Persons with Disabilities (Equal Opportunities, Protection of Rights and Full Participation) Act, 1995 (PWD Act) which reads "**All Government Educational Institutions and other educational institutions receiving aid from the Government, shall reserve not less than three percent seats for persons with disabilities**", is applicable No. reservation of jobs. Some parties, such as All Kerala Parents Association, Department of Health, Kumari Rekha appealed against the orders of the concerned Courts. The Hon'ble Supreme Court vide their order dated 11/9/2002 in Civil Appeal No. 6120/2001 and 18/9/2002 in Civil Appeals No. 4604 of 2000 and 7892/2001 have held that Section 39 of Persons with Disabilities, Act deals with reservation of seats for persons with disabilities in Govt. Educational institutions as well as educational institutions receiving aid from the Govt. and necessarily, therefore, the provision thereof must be complied with. Photo copies of the orders are enclosed.

It is requested that necessary instructions to all the concerned organizations, educational institutios including technical, medical, etc. may please be issued for compliance of the directions of the Hon'ble Supreme Court. The concerned authorities may also be requested that the provision of reservation of seats in admission is indicated in their prospectus/admission bulletin, etc. A copy of the interactions issued may please be sent to this office.

Yours faithfully,

(Thakur Datt Dhariyal)
Dy. Chief Commissioner, Disabilities.

University Grants Commission
Bahadurshah Zafar Marg,
New Delhi 110002

No. F. 6-1/2002 (CCP-II)

August, 2003

To,
The Registrar
University of Pune
Pune 411007
Maharashtra

Sub : Ensuring 3% reservation for persons with disabilities in Teaching & Non-Teaching Posts implementation of Hon'ble Supreme Court order dated 18.09.2003

Sir / Madam,

Kindly find enclosed a copy of the letter No. F 4-1/2001 U-5 dated 13-12-2002 alongwith its enclosures on the above subject, which is self explanatory and to request you to intimate the action taken in the matter by 10th Oct. 2003.

The contents of this letter may be brought to the notice of all the college affiliated to your universities

Yours faithfully

(Urmil Gulati)
Under Secretary

---

University of Pune
Reservation Cell
Ref. : Reservation/42/732
Date : 25/11/03

To,
The Director / Principal
All Recognised Institutes / Affiliated Colleges,

Sir,

Please find enclosed herewith a copy of Letter No. F. No. 4-1/2001 U-5, dated 13/12/2002 of Government of India for your information and further necessary action.

Thanking you

Your's faithfully

Sd/-xx

For Registrar

UGC/11-12

उच्च व तंत्र शिक्षण ...
शाखा ...उ.शाखा २
क्रमांक ...८८२१०२
दिनांक ...८/६/२००६
९८२०

प्रगत व उन्नत गटाचे तत्व (नॉन क्रीमिलेअर) अनुसूचित जाती व्यतिरिक्त, विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गांना लागू करतांना प्रमाणपत्राच्या नमुन्यातील बदल.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक सीबीसी १० /२००६/ प्र.क्र.१५/ मावक ५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२
दिनांक : ५ जून, २००६

वाचा :- १) शा.नि. सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९३/२१६७/सीआर-१४१/९३/१६-ब, दिनांक २३ मार्च, १९९४
२) शा.नि. स.क., सां.का. व क्री. विभाग क्र.सीबीसी-१०९४/प्र.क्र.८६/मावक-५, दिनाक १६ जून, १९९४
३) शा.नि. सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दिनांक १५ जून, १९९५
४) शा.नि. स.क., सां.का. व क्री.विभाग क्र.सीबीसी-१०९४/प्र.क्र.८६/मावक-५, दिनाक ५ जून, १९९७
५) शा.नि. सा.न्या.,सां.का., क्री. व वि.स.विभाग क्र.सीबीसी-१०/२००१/प्र.क्र.१२०/ मावक-५. दिनाक १ नोव्हेंबर, २००१
६) शा.नि. सा.न्या., सां.का. व वि.स.विभाग क्र.सीबीसी-१०/२००१/प्र.क्र.१११/मावक-५, दिनाक २९ मे, २००३

प्रस्तावना :- सामान्य प्रशासन विभाग, दिनांक २३ मार्च, १९९४ च्या शासन निर्णयानुसार केवळ भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) आणि इतर मागासवर्गांना उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअरचे) तत्व लागू केलेले आहे. आता महाराष्ट्र राज्य लोकसेवा - अनुसूचित जाती / जमाती व विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम - २००१ मधील कलम चार पोट कलम २(दोन) च्या परंतुका अन्वये उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअरचे) तत्व अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व्यतिरिक्त निरधिसूचीत जाती (अ) (विमुक्त जाती - अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) त्याचबरोबर इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग या मागास प्रवर्गांना लागू करण्याची तरतूद केली आहे. सदर तरतूद विचारात घेऊन उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअरचे) तत्व लागू करण्यासंबंधी खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

शासन परिपत्रक :- आरक्षण अधिनियम २००१ हा अधिनियम अंमलात आणल्याच्या दिनांक २९ जानेवारी, २००४ पासून अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व्यतिरिक्त निरधिसूचीत जाती

(विमुक्त जाती - अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग यांना उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअरचे) तत्व लागू करण्यात येत आहे.

२. पदोन्नती वगळता ज्या ज्या प्रयोजनाकरिता आरक्षणाचे आदेश लागू करण्यात आलेले आहेत, त्या त्या सर्व प्रयोजनाकरिता क्रिमीलेअरचे तत्व लागू राहील व त्याप्रमाणे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

३. उन्नत व प्रगत गटाच्या (क्रिमीलेअरच्या) मार्गदर्शक तत्वासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाने व विहित उत्पन्न मर्यादेसंदर्भात या विभागाने वेळोवेळी काढलेले आदेश विचारात घेण्यात यावेत.

४. संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक १६ जुन, १९९४ मधील मुद्दा क्रमांक ४ खाली, " . आदेश भटक्या जमाती (क) धनगर व तत्सम जाती, भटक्या जमाती (ड) वंजारी व तत्सम जाती आणि इतर मागासवर्ग यांना लागु रहतील" हा परिच्छेद वगळण्यात येत आहे.

५. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती सोडुन विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग यांना उन्नत व प्रगत गटाच्या तत्वानुसार प्रमाणपत्राचा नमुना परिशिष्ट "अ" प्रमाणे राहील.

हे शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे. तरी सर्व संबंधित प्राधिकाऱ्यांनी वरील सूचना तातडीने अमलात आणाव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणक संकेतांक २००६०६०५१५३०३८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

बलदेव चंद

(बलदेव चंद)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा / अपील शाखा, मुंबई (पत्राने)
संचालक, समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

महाराष्ट्र शासन
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
शासन परिपत्रक क्र.सीबीसी-1290/23116/प्र.क्र.378/मावक-5,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-400 032. दिनांक: 24 ऑगस्ट, 1995.

वाचा:- 1) गृह मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यांचे पत्र क्र.बीसी-12025/2/76/एससीटी-1, दिनांक 22 मार्च 1977

2) गृह मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, यांचे पत्र क्र.बीसी-16014/1/82/एससी अॅन्ड बीसीडी-1, दिनांक 18-11-1982.

3) गृह मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.बीसी-16014/1/82/एससी अॅन्ड बीसीडी-1, दिनांक 6 ऑगस्ट, 1984.

4) गृह मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.बीसी-16014/1/82/एससी अॅन्ड बीसीडी-1, दिनांक 22 फेब्रुवारी, 1985.

5) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्र.सीबीसी-1084/54577/1815/बीसीडब्ल्यू-5, दिनांक 1 नोव्हेंबर 1985.

परिपत्रक:- अॅक्शन कमिटी ऑन इश्यू ऑफ कास्ट सर्टिफिकेट टू शेड्युल कास्ट्स अॅन्ड शेड्युल ट्राईब्स इन द स्टेट ऑफ महाराष्ट्र व इतर यांनी सर्वोच्च न्यायालयात भारत सरकार विरुद्ध रिट पिटीशन (सी) क्रमांक:893/90 दाखल केले. या याचिकेत "ए" राज्याशी संबंधित असलेली अनुसूचित जात व अनुसूचित जमातीची व्यक्ती "ब" राज्यात स्थलांतरीत झाल्यावर त्या राज्यात सारखीच नामसदृष्य जात/जमात राज्य घटनेच्या हेतूसाठी "ब" ह्या राज्याशी संबंधित अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती म्हणून निर्देशित केली गेली असल्यास स्थलांतरीत राज्यात अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीकरीता असलेले हक्क/सवलतींकरीता पात्र समजले जाईल काय हा प्रश्न याचिकेत उपस्थित केला होता. ह्या याचिकेवर दिनांक 18-7-94 रोजी सर्वोच्च न्यायालयात घटनापिठाने जो निर्णय दिला आहे, त्या निर्णयाच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे शासनाकडून निदेश देण्यात येत आहेत.

(1) ज्या अनुसूचित जाती/सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गातील व्यक्ती (इतर मागासवर्ग) महाराष्ट्राबाहेरील राज्यातून महाराष्ट्रात स्थलांतरीत झाल्यास त्यांच्या मूळच्या राज्यात त्यांना जो अनुसूचित जाती/सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्यांचा दर्जा (इतर मागासवर्ग) त्यांना प्राप्त झालेला आहे. त्या दर्जाच्या आधारे फक्त मूळच्या राज्यात त्यांना अनुसूचित जाती/सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गाकरीता देय असलेले फायदे/सवलती प्राप्त होतील. महाराष्ट्र राज्यात त्यांना कोणत्याही सवलती/फायदे प्राप्त होणार नाहीत.

(2) एका राज्यातून दुस-या राज्यात नोकरी शिक्षण वगैरे करीता स्थलांतरीत होणा-या अनुसूचित जातीच्या व्यक्तींना ते ज्या राज्यात स्थलांतरीत झाले असतील, त्या राज्यात जातीची प्रमाणपत्रे मिळत नाही. स्थलांतरीतांची ही अडचण दूर करण्याकरीता केंद्र शासनाने त्यांच्या दिनांक 22-3-77 च्या पत्र क्रमांक:बीसी-12025/2/76/एससीटी-1, मधील सूचनांत अंशतः बदल करुन दिनांक 18-11-82, 6-8-84 आणि दिनांक 22-2-85 च्या वर नमूद केलेल्या पत्रान्वये एका राज्यातून दुस-या राज्यात स्थलांतरीत आलेल्यांना त्यांच्या वडिलांना त्यांच्या मूळ राज्यातील सक्षम अधिका-याने दिलेल्या प्रमाणपत्राच्या आधारावर ज्या प्रकरणात मूळ राज्यातर्फे चौकशी करणे आवश्यक आहे, अशी प्रकरणे वगळता जातीची प्रमाणपत्र द्यावीत. अशा सूचना निर्गमित केलेल्या आहेत. स्थलांतरीतांना जातीचे प्रमाणपत्र घेण्यासाठी त्यांना त्यांच्या मूळ राज्यात जावे लागू नये व ते ज्या राज्यात स्थलांतरीत झाले असतील त्या राज्यात त्यांना जातीचे प्रमाणपत्र मिळावे या उद्देशाने ही सवलत दिलेली आहे. या प्रमाणपत्राच्या आधारावर त्यांना त्यांच्या मूळ राज्यात जो दर्जा प्राप्त झालेला आहे व त्या जाती/वर्गासाठी ज्या सवलती देय होतात त्या सवलतीचा लाभ घेता येईल. तसेच केंद्र सरकार तर्फे देण्यात येणा-या सवलती देखील त्यांना देय ठरतील. परंतु महाराष्ट्र राज्यात जे स्थलांतरीत झाले असतील त्यांना राज्यातील सवलती प्राप्त होणार नाहीत असे पुनः एकदा स्पष्ट करण्यात येत आहे.

(3) महाराष्ट्र राज्यात व अन्य राज्यात ज्या समान जाती आढळून येतात अशा जातीपैकी एखाद्या समान असलेल्या जातीचे

प्रमाणपत्र महाराष्ट्राबाहेरील राज्यातील सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले असल्यास त्या प्रमाणपत्र धारकास या राज्यातील कोणतेही फायदे प्राप्त होणार नाहीत.

शिक्षण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण व सेवायोजन विभाग, आणि वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांनी नियंत्रणाखालील शासकीय व निमशासकीय कार्यालयाकरीता स्वतंत्ररित्या परिपत्रकाद्वारे वरील तरतुदी निदर्शनास आणाव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

व. यं. कांबळे,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

पालांचे सचिव,
मंत्र्यांचे सचिव,
, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
लेखापाल, महाराष्ट्र 1/2, मुंबई/नागपूर,
, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
धन व लेखा अधिकारी, मुंबई,
महानगर दंडाधिकारी,
जिल्हा दंडाधिकारी,
तालुका कार्यकारी दंडाधिकारी,
विभागीय आयुक्त,
लक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
लक, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
क्त आदिवासी कल्याण, महाराष्ट्र राज्य, नाशिक,
लक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
संचालक (जाग्रत), समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
विभागीय समाजकल्याण अधिकारी,
जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
जकल्याण अधिकारी, बृहन्मुंबई, मुंबई,
धक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई,
धक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
मंत्रालयीन विभाग,
त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदर आदेश त्यांचे अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांचे निदर्शनास आणून द्यावेत.
कार्यासने, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
निवड नस्ती, का. मावक-5.

---

पत्राद्वारे.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दि.५ मे,२०२१ च्या न्याय निर्णयाची अंमलबजावणी...
ईएसबीसी प्रवर्गातील उमेदवारांच्या नियुक्त्यांबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक :- बीसीसी-२०२१/प्र.क्र. ३८४/१६-ब,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :-५ जुलै,२०२१.

वाचा :-

१) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अध्यादेश २०१४ (सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.१३)

२) मा.उच्च न्यायालय,मुंबई यांचे रिट पिटिशन क्र.२०५३/२०१४ व इतर याचिका यावरील आदेश दि.१४.११.२०१४

३) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र.बीसीसी२०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३/१६-ब ,दि.२१.२.२०१५

४) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम, २०१४, (महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १/२०१५)

५) मा.उच्च न्यायालय,मुंबई यांचे रिट पिटिशन क्र.३१५१/२०१४ व इतर याचिका यावरील आदेश दि.७.४.२०१५

६) शासन शुद्धिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग, .बीसीसी२०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३/१६-ब ,,दि.२.१२.२०१५

७) महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरिता जागांचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम २०१८ (सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ६२) व आरक्षण (सुधारणा) अधिनियम,२०१९(सन २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.७)

८) मा.उच्च न्यायालय,मुंबई यांचे जनहित याचिका क्र. १७५/२०१८ वरील न्याय निर्णय दि.२७.६.२०१९

९) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र.बीसीसी२०१३/प्र.क्र.३५४(अ)/१६-ब, दि.११.७.२०१९

१०) मा.सर्वोच्च न्यायालयाचे विशेष अनुमती याचिका क्र.१५७३७/२०१९ वरील चे अंतरिम आदेश दि.१२.७.२०१९

११) मा.सर्वोच्च न्यायालयाचे सिव्हिल अपिल क्र.३१२३/२०२० वरील अंतरिम आदेश दि.९.९.२०२०

१२) मा.सर्वोच्च न्यायालयाचे सिव्हिल अपिल क्र.३१२३/२०२० वरील अंतिम आदेश दि.५.५.२०२१

प्रस्तावना-

राज्य शासनाने संदर्भ क्र. १ येथील आरक्षण अध्यादेश २०१४ अन्वये "शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग" निर्माण केला होता. सदर अध्यादेशातील कलम ४ (१) नुसार या प्रवर्गास सरळसेवेच्या पदभरतीमध्ये १६ टक्के आरक्षण विहित करण्यात आले होते. या अध्यादेशाविरोधात श्री. संजित शुक्ला व इतर यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.२०५३/२०१४ व इतर याचिका दाखल केल्या होत्या. या याचिकांवर मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी संदर्भ क्र.२ येथील दि. १४.११.२०१४ च्या आदेशान्वये दिलेल्या अंतरिम स्थगिती आदेशास अनुसरून, संदर्भ क्र.३ येथील दिनांक २१.२.२०१५ च्या शासन निर्णयान्वये शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी व शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाकरिता मा. उच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशानुसार करावयाच्या कार्यवाहीसंदर्भात सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आलेल्या होत्या.

२. संदर्भ क्र.१ येथील अध्यादेशाचे कायद्यात रूपांतर होऊन संदर्भ क्र.४ येथील आरक्षण अधिनियम, २०१४ अस्तित्वात आला. सदर अधिनियमास याचिकाकर्त्यांनी रिट याचिका क्रमांक ३१५१/२०१४ अन्वये आव्हान केले होते. या प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या संदर्भ क्र.५ येथील दिनांक ७.४.२०१५ रोजीच्या आदेशानुसार संदर्भ क्र. ४ येथील महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १/२०१५ या अधिनियमास स्थगिती देण्यात आली व मा. उच्च न्यायालयाने दिलेले आदेश विचारात घेता, संदर्भ क्र.३ येथील दिनांक २१.२.२०१५ च्या आदेशात सुधारणा करून शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी व शैक्षणिक संस्थामधील प्रवेशांसदर्भात संदर्भ क्र.६ येथील दि.२/१२/२०१५ च्या शासन शुद्धिपत्रकान्वये खालीलप्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करण्यात आले होते -

अ) शासकीय व निमशासकीय सेवेतील रिक्त पदांसाठी दि.१४.११.२०१४ पूर्वी, शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणासह जाहिरात दिली असल्यास, अशा पदांवर मा. उच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय होईपर्यंत खुल्या प्रवर्गातील, गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांमधून तात्पुरत्या स्वरूपात जास्तीत जास्त ११ महिन्यांच्या कालावधीसाठी किंवा सदर न्यायालयीन प्रकरणाचा अंतिम निर्णय, यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीकरिता, तदर्थ स्वरूपात नेमणुका करण्यात याव्यात.

ब) उपरोक्त नेमणूका या मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्र.३१५१/२०१४ श्री.संजीत शुक्ला विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर संलग्न याचिका या प्रकरणी होणा-या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून करण्यात येतील, ही बाब संबंधितांच्या नियुक्ती आदेशात स्पष्टपणे नमूद करण्यात यावी.

३. मा. उच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय होईपर्यंत खुल्या प्रवर्गातील, गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांमधून तात्पुरत्या स्वरूपात जास्तीत जास्त ११ महिन्यांच्या कालावधीसाठी देण्यात आलेल्या नियुक्त्यांना मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या अंतरिम आदेशानुसार मुदतवाढ देण्यात आली आहे.

४. संदर्भ क्र. ७ येथील आरक्षण अधिनियम २०१८ अन्वये "सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग" (एसईबीसी) निर्माण करण्यात आला. सदर अधिनियमातील कलम ४ (१) (ख) नुसार सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्गासाठी १६ टक्के आरक्षण देण्यात आले आहे. सदर अधिनियमातील कलम १८(१) अनुसार संदर्भ क्र. ४ येथील आरक्षण अधिनियम निरसित करण्यात आला. तसेच कलम १८(२) (एक) अनुसार संदर्भ क्र. ४ येथील निरसित करण्यात आलेल्या अधिनियमान्वये काढण्यात आलेले कोणतेही नियम, अधिसूचना, आदेश, परिपत्रक किंवा निदेश यांसह करण्यात आलेली किंवा करण्याचे अभिप्रेत असलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही किंवा कलम १८(२) (दोन) अनुसार अशा प्रकारे निरसित करण्यात आलेल्या अधिनियमान्वये केलेली कोणतीही नियुक्ती, सुरू केलेली कोणतीही निवड प्रक्रिया, कोणत्याही शैक्षणिक संस्थेत घेतलेला प्रवेश, उपर्जित केलेला किंवा घेतलेला कोणताही हक्क, विशेष हक्क आबंधन किंवा संपादित दायित्व, यांस बाधा न येता ते पुढे चालू राहणार आहे किंवा त्याची अंमलबजावणी सुरू राहिल, अशी तरतूद करण्यात आली.

५. संदर्भ क्र. ७ येथील आरक्षण अधिनियम २०१८ या अधिनियमास जनहित याचिका क्रमांक १७५/२०१८ आणि इतर संबंधित प्रकरणे यांमध्ये, सदर अधिनियमाच्या विधिग्राह्यतेला मा.मुंबई उच्च न्यायालयामध्ये आव्हान देण्यात आले होते. मा.उच्च न्यायालयाने संदर्भ क्र.८ येथील दिनांक २७ जून २०१९ रोजी उक्त प्रकरणांतील न्यायनिर्णयाद्वारे सदर अधिनियमाची विधिग्राह्यता कायम ठेवण्यात आली आहे.

६. संदर्भ क्र.७ येथील आरक्षण अधिनियम २०१८ वैध ठरविल्याने ईएसबीसी आरक्षण अध्यादेश, २०१४ या अध्यादेशानुसार दि.०९.०७.२०१४ ते दि.१४.११.२०१४ या कालावधीत ईएसबीसी आरक्षणासह जाहिरात देवून निवडप्रक्रिया राबविण्यात आलेली असेल अथवा सुरू केली असेल व त्यानुसार नियुक्त्या देण्याची कार्यवाही पूर्ण केली असेल किंवा प्रलंबित असेल, अशा सर्व प्रकरणांमध्ये सुरू केलेली निवड प्रक्रिया पुर्णत्वास आणावी, मा.उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार, मा.उच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयास अधिन राहून, ईएसबीसी करीता आरक्षित असलेल्या पदांवर खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना गुणवत्तेनुसार देण्यात आलेल्या नियुक्त्या संपुष्टात आणाव्यात व त्या पदांवर ईएसबीसी प्रवर्गातील उमेदवारांना निवडसूचीनुसार नियुक्त्या देण्यात याव्यात, असे आदेश संदर्भ क्र.९ येथील दि.११ जुलै,२०१९ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित

करण्यात आले होते. तथापि,विशेष अनुमती याचिका क्र.१५७३७/२०१९ (जयश्री लक्ष्मण पाटील विरूद्ध म.शा.व इतर) यामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने संदर्भ क्र.१० येथील दि.१२.७.२०१९ रोजी पारित केलेल्या अंतरिम आदेशान्वये मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी रिट पिटिशन क्र.१७५/२०१८ वर दि.२७.६.२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाची किंवा प्रश्नाधिन आरक्षणाची अंमलबजावणी पुर्वलक्षी प्रभावाने करता येणार नाही,असे स्पष्ट केले आहे.त्यामुळे संदर्भ क्र.९ येथील दि.११ जुलै,२०१९ च्या शासन निर्णयास मा.उच्च न्यायालयाने वेळोवेळी स्थगिती दिल्यांने सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी होऊ शकली नाही.

७. मा.उच्च न्यायालयाच्या दि.२७.६.२०१९ च्या निर्णयाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्र.१५७३७/२०१९ दाखल करण्यात आली. सदर विशेष अनुमती याचिकेत दाखल करण्यात आलेल्या सिव्हिल अपिल क्र.३१२३/२०२० मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने संदर्भ क्र.११ येथील दि.०९.०९.२०२० च्या आदेशान्वये मराठा आरक्षणास स्थगिती देताना पदभरती संदर्भात खालीलप्रमाणे अंतरिम आदेश पारित केले-

© Appointments to public services and posts under the Government shall be made without implementing the reservation as provided in the Act.

८. मा.सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षण प्रकरणी संदर्भ क्र.१२ येथील दि.५ मे,२०२१ रोजी दिलेल्या अंतिम आदेशान्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (एसईबीसी आरक्षण अधिनियम,२०१८ अवैध ठरवून मराठा आरक्षण रद्द केले आहे.मा.सर्वोच्च न्यायालयाने एसईबीसी प्रवर्गाचे आरक्षण रद्द करतांना त्यामध्ये खालील बाबी स्पष्ट केल्या आहेत-

(अ) मा.उच्च न्यायालय,मुंबई यांच्या दि.२७.०६.२०१९ च्या निर्णयानंतर मा.सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षणास दि.९.९.२०२० रोजी स्थगिती देईपर्यंत SEBC वर्गातून मराठा समाजातील उमेदवारांच्या शासन सेवेमध्ये केलेल्या नियुक्त्या कायम राहतील.तथापि, SEBC वर्गातून शासन सेवेत नियुक्त झालेल्या मराठा समाजाच्या उमेदवारांना SEBC आरक्षणाचे कोणतेही लाभ पुढे अनुज्ञेय राहणार नाहीत.

(ब) दि.९.९.२०२० च्या स्थगिती आदेशानंतर सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग आरक्षण अधिनियम,२०१८ अनुसार कुणालाही शासन सेवेत नियुक्त्या देता येणार नाहीत.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता संदर्भ क्र.१ येथील महाराष्ट्र राज्य शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता आरक्षण अध्यादेश,२०१४ अनुसार नियुक्ती करिता शिफारस करण्यात आलेल्या ईएसबीसी प्रवर्गातील उमेदवारांना विविध पदांवर नेमणूका देण्यासंदर्भात निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र.३१२३/२०२० मध्ये दि.५ मे,२०२१ रोजी दिलेल्या न्याय निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी-

(१) मा.सर्वोच्च न्यायालयाचा दि.५ मे,२०२१ चा निर्णय विचारात घेता शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गातून दि.१४.११.२०१४ पर्यंत (मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी ईएसबीसी आरक्षणास स्थगिती देईपर्यंत) ज्या उमेदवारांना ईएसबीसी प्रवर्गातून नियुक्त्या देण्यात आल्या असतील त्या कायम करण्यात याव्यात.

(२) मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक ७.४.२०१५ रोजीच्या आदेशानुसार शासकीय व निमशासकीय सेवेतील रिक्त पदांसाठी दि.१४.११.२०१४ पूर्वी, शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणासह जाहिरात दिली असल्यास, अशा पदांवर मा. उच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय होईपर्यंत खुल्या प्रवर्गातील गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांमधून तात्पुरत्या स्वरूपात जास्तीत जास्त ११ महिन्यांच्या कालावधीसाठी किंवा सदर न्यायालयीन प्रकरणाचा अंतिम निर्णय, यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीकरिता, तदर्थ स्वरूपात करण्यात आलेल्या नेमणूका कायम करण्यात याव्यात.

२. मा.सर्वोच्च न्यायालयाचे दि.१२.०७.२०१९, दि.०९.०९.२०२० व दि.०५.०५.२०२१ चे आदेश विचारात घेता संदर्भ क्र.९ येथील दि.११ जुलै,२०१९ चा शासन निर्णय याद्वारे रद्द करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, सेवामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महामंडळे, शासकीय अनुदान प्राप्त संस्था, विद्यापीठे, सहकारी संस्था, शासकीय उपक्रम व शासनाच्या अधिपत्याखालील किंवा शासनाने अनुदान दिलेली मंडळे इत्यादींना लागू राहील. याबाबत सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांना/आस्थापनांना योग्य ते आदेश निर्गमित करावेत.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२१०७०५१५४३०९६७०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rasik Ambadas Khadse

Digitally signed by Rasik Ambadas Khadse
Date: 2021.07.05 15:45:58 +05'30'

(र.अं.खडसे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. विरोधीपक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

२. मा. सर्व सन्माननिय विधानसभा / विधानपरिषद व संसद सदस्य महाराष्ट्र राज्य.
३. मा. राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
४. मा. मुख्यमंत्र्यांचे अप्पर मुख्य सचिव प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान परिषद) विधानभवन, मुंबई.
६. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान सभा) विधानभवन, मुंबई.
७. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.
८. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र- १. मुंबई
९. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र- २. नागपूर
१०. महासंचालक माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
११. प्रबंधक, मा. उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१२. प्रबंधक मा. उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,
१३. प्रबंधक, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर
१४. प्रबंधक मा. लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई.
१५. सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य
१६. सर्व जिल्हा परिषदाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य
१७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१८. सर्व मंत्री/राज्यमंत्री याचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१९. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
२०. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
२१. सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई
२२. सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुळ शाखा व अपील शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,
२३. सरकारी वकील, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर
२४. सर्व महापालिकांचे आयुक्त
२५. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका
२६. विधीमंडळ ग्रंथालय, महाराष्ट्र विधानभवन, मुंबई (१० प्रती)
२७.सर्व महामंडळे, मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक
२८. निवड नस्ती/कार्यासन १६-ब.